# प्रकरण पहिले

## विनोदाचे स्वरूप आणि मराठी विनोदी कथेची परंपरा

### प्रास्ताविक -

१) विनोद : अर्थ व व्याख्या

२) विनोदाचे स्वरूप

३) विनोदाचे प्रकार

४) मराठी विनोदी कथेची परंपरा व स्वरूप

.....

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

## प्रकरण पहिले

## विनोदाचे स्वरूप आणि मराठी विनोदी कथेची परंपरा

### प्रास्ताविक :

अर्वाचीन काळातील मराठी साहित्याचे विहंगमावलोकन केले तर मराठी साहित्य विविधतेने आणि विपूलतेने संपन्न होत आल्याचे दिसून येते. आशय आणि अभिव्यक्ती या उभयविध दृष्टीने अनेक सकस वळणे मराठी साहित्याने आत्मसात केली. अनेकविध वाङ्‌मयप्रकार निर्माण झाले. त्यातील ग्रामीण साहित्य हा एक महत्वाचा वाङ्‌मयप्रकार आहे. ग्रामीण साहित्यातही "ग्रामीण कथा" विपूल प्रमाणात लिहिली गेली. प्रामुख्याने वि.स.सुखठणाकर लक्ष्मणराव सरदेसाई, र.वा. दिघे, द.र. कवठेकर, म.भा. भोसले, श्री.म. माटे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार, आनंद यादव मधु मंगेश कर्णिक, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, रणजित देसाई इत्यादी साहित्यिकांनी विपूल प्रमाणात ग्रामीण कथा लिहिल्या. या प्रमुख कथाकारात द.मा. मिरासदार यांच्या कथा लक्षणीय आहेत.

ग्रामीण मराठी कथेत विनोदी कथांचे स्वतंत्र दालन निर्माण करण्यात आणि ते समृध्द करण्यात शंकर पाटील, द.मा. मिरासदार यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. मराठी ग्रामीण विनोदी कथेत द.मा. मिरासदार हा एक मानदंड आहे. रसिकप्रिय कथाकार म्हणूनही द.मा. मिरासदार यांचे स्थान महत्वाचे आहे. मिरासदार यांनी एका निष्ठेने आणि सातत्याने सकस ग्रामीण मराठी विनोदी कथांचे लेखन केले आहे.

द.मा. मिरासदार यांच्या कथामध्ये प्रथमदर्शनी काही महत्त्वाची वैशिष्टये निश्चितच जाणवतात. मिरासदारांचे बालपण खेड्यात गेले व नंतर नागर जीवनाचे संस्कार त्यांच्यावर झालेले असल्याने ग्रामीण जीवनातील विसंगती त्यांना चटकन जाणवते. त्यांच्यावर लहानपणी झालेले ग्रामीण

जीवनाचे संस्कार त्यांनी संवेदनशीलतेने टिपलेले आहेत. त्यामुळे मिरासदारांच्या कथांना एक वेगळा रंग आहे. सलगपणे आणि यशस्वी ग्रामीण विनोदी कथा लिहिणारे मिरासदार हे एकमेव लेखक आहेत.

मिरासदारांनी ग्रामीण जीवनात अदृश्यपणे वावरत असणारा विनोदाचा एक रांगडा धागा मोठ्या कौशल्याने बाजूला काढून दाखविला आहे. मिरासदारांचा कल हास्यकथेकडे आहे. हास्यकथा म्हटली की निवेदनशैलीला महत्व आलेच. वाचकाचे मन ओळखून मिरासदार सतत निवेदन करतात. त्यामुळेच अंत:र्मुख आविष्कारापेक्षा त्यांची कथा बहिर्मुख निवेदनाच्या पातळीवर येते. त्यामुळेच त्यांच्या विनोदबुध्दीला त्यांच्या कथेत अधिक वाव मिळतो.

या सर्व प्रथमदर्शनी जाणवणाऱ्या वैशिष्टयामुळे द.मा. मिरासदार यांच्या कथा लेखनाचा सखोल वेध घेणे गरजेचे वाटते. त्यासाठी त्यांच्या "माझ्या बापाची पेंड" व "गप्पागोष्टी" या दोन कथासंग्रहातील कथांचा चिकित्सक अभ्यास मिरासदारांच्या कथासाहित्याचा प्रातिनिधीक अभ्यास ठरणार आहे.

मिरासदारांच्या विनोदी कथांचा अभ्यास करण्यासाठी विनोद म्हणजे काय, विनोदाचे स्वरुप आणि मराठी विनोदी कथेची परंपरा यांचे विहंगमावलोकन मिरासदारांच्या कथांच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरणार आहे. म्हणून तत्संबंधीचा स्थूल विचार येथे प्रस्तूत ठरतो.

"विनोद" - अर्थ :

"विनोद" या शब्दाची व्युत्पत्ती "वि" या धातूस "नुद" प्रत्यय लागून झालेली आहे. या शब्दाचा अर्थ "आनंद, थट्टा, गंमत" असा आहे.[१] संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी हास्यरसाच्या अनुषंगाने विनोदाचा विचार केला आहे. भरतमुनी हास्यरसाला शृंगाराचा अंगभूत रस मानतात. भोजानेही हास्यरस शृंगाराशी निगडित केला आहे. अभिनव गुप्तांनी "विकृतत्व", विपरीतत्व किंवा अनौचित्य या कारणामुळे हास्यरस निर्माण होतो असे सांगून "ऐतेन

सर्वेरसा हास्यन्तर्भूता इति दर्शितम् ।" अशाप्रकारे हास्यरसाचा सर्व रसात अंतर्भाव केला आहे.[२] तर रामचंद्र-गुणचंद्र "हास्यरस" हा एक भावसूचक नसून अनेक भावातून त्याची निर्मिती होते असे सांगतात. शारदातनय हास्यरसाविषयी लिहितो;-"त्रिपुरदाह नावाच्या नाटकात शंकराच्या पराक्रमाचे वर्णन आहे. जटा व अजिन धारण करणारा, सर्पांची भूषणे घालणारा व तीन नेत्रांचा (विचित्र वेषधारी) शंकर, पार्वतीसारख्या (सुंदर व सुकुमार) वधूशी प्रेमलीला करु लागतो, हे पाहून तिच्या सख्यांना हसू आवरेना. अशाप्रकारे शंकर-पार्वतीच्या शृंगारातून हास्याची उत्पत्ती झाली."[3]

## हास्यरस आणि विनोद :

संस्कृत साहित्यशास्त्राने "हास्यरसा"चा विचार अन्यरसांच्या अनुषंगाने केला आहे. "हास्यरस" आणि आजचा "विनोद" यात मुलभूत स्वरूपाचा फरक आहे. केवळ हास्यनिर्मिती करणे हे विनोदाचे प्रयोजन नाही. संस्कृत साहित्यात हास्योत्पादक घटकांना विदूषकीपणा प्राप्त झाला. किंबहूना विदूषक हे हास्य निर्माण करणारे पात्र म्हणून निश्चित झाले. विदुषकाच्या शारीरिक विकृती, वेषभूषा आणि बोलणे-चालणे इत्यादी हालचालीतून हास्यरस निर्माण झालाच पाहिजे या दृष्टिकोणातून संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी विदूषकाच्या निर्मितीचा एक सर्वसामान्य असा नमुना निर्माण केला. विदुषकाच्या या पात्रातून विदूषकाचे भोजनप्रेम, त्याचा भित्रेपणा, विद्वत्तेची पोकळ बढाई, हावरेपणा, मुर्खपणा, बावळटपणा, हजरजबाबीपणा आणि कधी कधी मार्मिक उद्‌गारातून दिसणारे शहाणपण इत्यादी गुण त्याला प्रदान केले. हे गुणच हास्यकारक ठरले.

## विनोदविषयक विविध उपपत्ति :

पाश्चात्य साहित्यशास्त्रकारांमध्ये जेम्स अली याने विनोदाची मीमांसा

क्रिडावृत्तीच्या अनुरोधाने केली आहे. त्याच्या मते, "कोणात्या ना कोणात्या प्रकारचे व्यंग, रुढि-नियम यांचा किरकोळ भंग यांकडे आपण क्रीडावृत्तीने बघू शकलो तर हास्यकारकता प्रत्ययाला येते.[४] तर विनोदाच्या निर्मितीविषयीची बर्गसॉंची उपपत्ति "चेतनांवर यांत्रिकाचे आवरण पडल्याची प्रतीती विनोदात्म ठरते" असे सांगते.[५] बर्गसॉं पुढे म्हणातो, "जिथे जिथे एक प्रकारचे दार्ढ्य, अवधानरहितता, लवचिकपणा यांचा अभाव आढळतो, तिथे तिथे एक प्रकारे चेतनांवर यांत्रिकाचे आवरण पडल्याचा प्रत्यय येत असतो. असा प्रत्यय विनोदात्म असतो."

आधुनिक मराठी साहित्याभ्यासकांनी विनोदाचे विवेचन केलेले आहे. वा.म. जोशी विनोदाची व्याख्या पुढीलप्रमाणे करतात, "हास्योत्पादक गोष्टींचे प्रेमगर्भ व खेळकर वृत्तीने केलेले चिंतन".[६] तर डॉ. गो.मा. पवार "वेगवेगळया पातळयांवरील दोन विभिन्न आकलनांचा परस्पराघात आकस्मिकपणे प्रत्ययाला आणून जीवनविषयक सुखात्म जाणिवेची प्रतीती देणारा धर्म म्हणाजे विनोद अथवा विनोदात्मता." अशी विनोदाची व्याख्या करतात.[७] मा.का. देशपांडे विनोदाची व्याख्या करताना म्हणातात, "विनोद म्हणाजे जीवनातील विसंगतीचे सहृदय, कलात्मक व स्मितोत्पादक चित्रण.[८] तर डॉ. मालशे यांनी "विनोदाचे व्याकरण" या लेखात म्हटले आहे की, "विसंगती, अपेक्षाभंग, यांत्रिकता आणि प्रमाणाभंग अशा वेगवेगळया गोष्टी हास्याच्या जनक म्हणून पुढे मांडल्या गेल्या आहेत. पैकी विसंगती हेच आदिकारण, हे मत आता स्थिर झाल्यासारखेच आहे. कारण प्रमाणाभंग, यांत्रिकता, अपेक्षाभंग यांच्याही मुळाशी विसंगतीच असते."[९] गो.के. भट विनोदाविषयी म्हणातात, "विनोद ही एक दृष्टी आहे. जीवनाकडे पाहण्याची ती एक वृत्ती आहे. जीवनात लोकांच्या आचार, विचार, उच्चारात विकृती किंवा विसंगती दिसून आली की तिच्याकडे सात्विक संतापाने जसे पाहता येते तसे

दिलखुलासपणे हसूनदेखील पाहता येते."[१०] न.चिं. केळकर हास्याची व्याख्या करतात ती अशी की, "सहानुभूतीमुळे होणाऱ्या दु:खावरचा उतारा किंवा त्याचे भंजन म्हणजेच हास्य होय." [११]

"मराठी विनोद" या प्रबंधात डॉ. उषा जोशी यांनी अनेक तत्त्ववेत्यांच्या विचारांचा परामर्श घेऊन हे स्पष्ट केले आहे की, "विनोदाची सर्वांगपरिपूर्ण व्याख्या कोणासही करता आलेली नाही." वरील अनेकविध व्याख्यांपैकी "जीवनातील विसंगतीचे सहृदयतेने केलेले चिंतन आणि त्याचा कलात्मक आविष्कार म्हणजे विनोद होय." ही मा.का. देशपांडे यांची व्याख्या स्वीकारार्ह वाटते आणि विनोदी साहित्याचा विचार करताना गंगाधर गाडगीळांचे "विनोदी साहित्य हे नुसते विनोदी असून चालत नाही तर ते साहित्यही असावे लागते." [१२] हे विधान महत्त्वपूर्ण ठरते.

### विनोदाचे स्वरूप :

विनोदाकडे नेहमी संशयाने पाहिले गेले आहे. विनोद म्हणजे विदुषकीपणा, तुच्छता, विकृतपणा, बाष्कळता, निंदा-टवाळी, बेजबाबदारपणा इत्यादी गैरसमज आहेत. "टवाळाआवडे विनोद" हा समर्थांचा अभिप्राय त्याचाच द्योतक आहे. परंतु हाच विनोद जेव्हा विशुध्द भूमिकेवरून आविष्कृत होऊ लागतो, त्यावेळी तो मानवी मनातील चिंता, भय, दु:ख नाहिसे करण्याचे महत्त्वाचे कार्य करतो. त्याचबरोबर निखळ आनंदही देतो. याची जाणीव अलीकडे सर्वांना होऊ लागली आहे. विनोदी लेखकाकडेही तो बालिश आणि उथळ विचारांचा म्हणून पाहिले जात असे. पण विनोदी लेखक हा मार्मिक रसज्ञ, विचारवंत असतो.

### विनोदाचे महत्त्व :

माणसामध्ये दैवी आणि पाशवी अशा ज्या सुप्त दुहेरी शक्ती

आहेत, त्या दोहोंचाही विनोदाशी संबंध आहे. त्यामुळेच विनोद माणसाचे जागेपण सतत तेवत ठेवण्याचे कार्य करतो. विनोद माणसातील पाशवी शक्तीला उपहास-उपरोधाच्या रूपाने चपराक देतो आणि मानवाला अस्वस्थ करतो. माणसातील विसंगतीकडे बोट दाखवून त्याला अंतर्मुख करतो. विशुध्द विनोदाच्या रूपाने निर्माण होणारे हास्य मानवाला चांगल्याप्रकारे जीवन जगण्याची प्रेरणा देते. "विनोद" हा एक प्रगल्भवृत्तीची जाणीव देणारा जीवनधर्म आहे आणि मानवी संस्कृतीने जपलेला तो एक अमोल ठेवा आहे.

प्र.के. अत्रे म्हणतात, "विनोद हा स्वत: वाईट नाही. पण त्याचे नातेवाईक फार आहेत. वात्रटपणा, गावंढळपणा, चावटपणा, पांचटपणा ग्राम्यता, अश्लीलता, बीभत्सपणा असे एकापेक्षा एक इरसाल असे त्याचे नातेवाईक आहेत. त्यामुळे लोकांचे गैरसमज होतात." [१३]

"विनोदा"ला मानवी जीवनात महत्वाचे स्थान आहे. कारण मानवी जीवन हे काटेकोर, कृत्रिम, साचेबंद व यांत्रिक नाही. सामाजिक, धार्मिक, राजकीय व दैनंदिन जीवनामध्ये कितीतरी प्रसंग हे विसंगत असतात. त्यातून विनोद घडतो व जीवन सुसह्य होण्यास मदत होते. तुकारामासारखे संत "सुख पाहता जवापाडे, दु:ख पर्वताएवढे" असे सांगतात ते जीवन जगताना पदोपदी जाणवते. अशा जीवनाला सामोरे जाताना "विनोदा"ची आवश्यकता आहे. मानसिक ताण-तणाव, सामाजिक संघर्ष यावर फुंकर घालण्याचे कार्य "विनोद" करतो. विनोदाच्या सहाय्याने जीवनातील अनेक संकटाकडे खेळकरपणे पाहता येते व त्या संकटाला सामोरे जाता येते.

"विनोदा"चा संबंध बुध्दिशी व भावनेशी निगडित असल्याने आणि त्याच्या योग्य वापर केल्याने मानवी जीवन सुसह्य होण्यास मदत होते. आपल्या यांत्रिक जीवनात खिलाडूपणा, आनंद, विविधता येण्यासाठी विनोदाची

मदत घ्यावी लागते आणि आता तर "विनोदा"कडे चांगल्या भावनेने पाहिले जाते. विनोदाला प्रतिष्ठा, सुसंस्कृतपणा प्राप्त झालेला आहे.

विनोदाचे प्रकार :

विनोदाचे प्रकार अनेक आहेत. उपरोध, उपहास, व्याजोक्ती, उनोक्ती, अतिशयोक्ती, श्लेष हे सर्वांना परिचित असणारे विनोदाचे प्रकार आहेत. याशिवाय अनेक अभ्यासकांनी विनोदाचे वेगळेवेगळे प्रकार आपआपल्या सोयीनुसार केलेले आहेत.

न.चिं. केळकरांनी आपल्या "हास्यविनोदमीमांसा" या ग्रंथात कोटी व विनोद यांची चर्चा केली आहे. मात्र त्यांनी हास्याच्या सर्वच लेखनप्रकारांची साक्षेपाने चर्चा केलेली नाही. वा.म. जोशी यांनी "विनोदाचे मृदू, मधुर, कटू, तीव्र, तीक्ष्ण असे अनेक भेद असून त्या प्रत्येकाला जन्म देणाऱ्या बुध्दीचे विशेष - १) विनोदाचा हेतू, २) त्याचे क्षेत्र, ३) त्याचे कार्य अथवा त्याची साधने, ४) त्याचा श्रोतृवर्ग यादृष्टीने ते ध्यानात धरले पाहिजे." [१४] असे सांगून विनोदातील या घटकांकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. तर "मराठी विनोद" या प्रबंधात उषा जोशी यांनी फाऊलर या इंग्रजी साहित्यशास्त्रकाराने विनोदाचे केलेले विनोद, कोटी, उपहास, उपरोध, गालिप्रदान, गूढार्थित्व, आदरशुन्यत्व, कटूहास्य हे प्रकार नोंदविलेले आहेत.

विनोदाचे प्रामुख्याने स्वभावनिष्ठ विनोद, प्रसंगनिष्ठ विनोद, शब्दनिष्ठ विनोद असे प्रकार केले जातात.

स्वभावनिष्ठ विनोद :

स्वभावनिष्ठ विनोद हा मानवी स्वभावातील सुसह्य स्वभावविशेषावर आधारलेला असतो. मानवी स्वभाव हा विविध वृत्ती-प्रवृत्तींचा आहे. त्यामुळे

स्वभावनिष्ठ विनोदाला एक वेगळीच खुमारी येते. मानवी स्वभावातील दोषांचा तिरस्कार न करता, ज्याच्यामुळे गंमत वाटून येईल असा स्वभाव-निष्ठ विनोद वरच्या दर्जाचा आणि निर्भेळ मानला जातो.

प्रसंगनिष्ठ विनोद :

प्रसंगनिष्ठ विनोद हा प्रसंगावर आधारलेला असतो. अशा प्रसं-गात विपरीतपणा किंवा संकट यांचा समावेश असतो. तसेच त्या प्रसंगातील संकट हे असंबध्द किंवा अनपेक्षित असते. नेहमीच्या जीवनातील चाकोरीशी त्याचा संबंध नसतो आणि त्यापासून होणारे दु:ख हे हलके असल्यामुळे त्या प्रसंगापासून निर्माण होणा-या आनंदाला बाधा येत नाही.

शाब्दनिष्ठ विनोद :

शाब्दनिष्ठ विनोदात अतिशयोक्ती हा विनोदाचा आधार असतो. आणि त्याद्वारे विनोदाची निर्मिती केली जाते. ही अतिशयोक्ती शाब्दिक कसरतीतून केली जाते. शाब्दनिष्ठ विनोदात शाब्दांची पुनरा-वृत्ती, ताल, अनुप्रास, श्लेष आणि सुक्ष्म बुध्दीच्या अभ्यासकाला माहित असलेल्या भाषेच्या सर्व क्लृप्त्या या प्रकारात प्रकट झालेल्या असतात.

मराठी विनोदी कथेची परंपरा व स्वरुप :

प्राचीन मराठी साहित्यात विनोदाचे अस्तित्व जाणवते. तो प्रसं-गोत्पात आलेला आहे. विनोदाकडे पाहण्याची "आजची दृष्टी" त्या काळात नसणे स्वाभाविक होते. तथापि चक्रधर, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादी संतकवी, वामनपंडित, मोरोपंत, श्रीधर इत्यादी पंत कवी आणि शाहीरांनीसुध्दा विनोदाचा आश्रय घेतलेला दिसतो. पण एकंदरीत प्राचीन मराठी साहित्यात विनोदाकडे दुर्लक्ष झाल्याचेच दिसून येते. "मोक्ष" हे

OLHAPUR

जीवनध्येय मानून त्याच्या प्राप्तीसाठी अध्यात्मज्ञान आणि भक्ती यासाठी अवतरलेल्या साहित्यात विनोदाचे स्थान नगण्य राहिले आहे. प्राचीन साहित्यात विनोदी साहित्याची परंपरा निर्माण झालेली नाही.

अव्वल इंग्रजी कालखंड हा भारतीयांच्या जीवनाच्या आणि म्हणूनच साहित्याच्या दृष्टीने क्रांतीकारक ठरलेला आहे. इंग्रजी संस्कृतीच्या आणि साहित्याच्या परिचय-परिशिलनातून अनेक साहित्यप्रकार आणि प्रवाह मराठी साहित्यात मुक्कामाला आले आणि विकसित झाले. त्यात विनोदाचाही समावेश होतो. विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी उपहासासाठी विनोदाचा मार्मिक उपयोग करतानाच विनोदाला व्यापकता प्राप्त करुन दिली. टवाळांच्या पंक्तीत जाऊन बसलेला आणि मध्ययुगीन व अव्वल इंग्रजीच्या काळात अंगचोरपणाने वावरणारा विनोद श्री.कृ. कोल्हटकर यांच्या लेखणीने प्रतिष्ठीत झाला. कोल्हटकरानंतर बाळकराम उर्फ राम गणेश गडकरी, न.चिं. केळकर, कॅ.लिमये, ना.धों ताम्हणकर, चिं.वि. जोशी, प्र.के. अत्रे, शामराव ओक, दत्तू बांदेकर, वि.वि. बोकील, पु.ल. देशपांडे, वि.आ. बुवा, गंगाधर गाडगीळ, रमेश मंत्री, जयवंत दळवी, वसंत सबनीस, सुभाष भेण्डे, इंद्रायणी सावकार इत्यादी साहित्यिकांनी विनोदाचा विविधांगी आविष्कार करुन मराठी साहित्यात विनोदाला अधिष्ठान प्राप्त करुन दिले.

## विनोदी कथा :

मराठी साहित्यात विनोदाचा आविष्कार कथा, कादंबरी, नाटक, व्यक्तिचित्र, एकांकिका, काव्य या साहित्यप्रकारातून होत राहीला. तथापि येथे कथावाङ्‌मयाच्या अनुषंगाने मराठी विनोदीकथेच्या प्रवाहातील प्रमुख टप्पे अवलोकन करावयाचे आहेत.

मराठी वाङ्‌मयातील लघुकथेच्या कालखंडात विनोदी कथांचे दालनही चांगलेच समृध्द आहे. उपहास, उपरोध, विसंगती, अतिशयोक्ती, ढोंगीपणा,

अज्ञान, पात्रांचा त-हेवाईकपणा, वैचित्र्यपूर्ण घटनांची गुंतागुंत यावर या विनोदी कथांची उभारणी झालेली दिसते. श्री.कृ. कोल्हटकरांपासून सुरु झालेल्या विनोदी कथेला आता या काळात नव्याने बाळसे येऊ लागले असे म्हणता येईल.

श्री.कृ. कोल्हटकर :

आधुनिक मराठी साहित्यात केवळ विनोदी म्हणता येईल अशा लेखनाला जोरकस प्रारंभ करुन त्याचे संपन्न रुप दाखविले ते श्री.कृ. कोल्हटकरांनी. त्यांच्या विनोदी लेखनापाठीमागे जीवन दर्शन व रंजकता या दुहेरी प्रेरणा आढळतात. उपहासरुप व कोटिरुप अशा दोन्ही प्रकारचे श्रेष्ठ दर्जाचे विनोदी लेखन त्यांनी केले.

त्यांचे "शिमगा", "श्रावणी", "गणेशचतुर्थी", "धर्मांतर", "यश सिध्दीचे सोपे व अचूक मार्ग" इत्यादी उपहासपर लेख जीवनदर्शनाच्या प्रेरणेतून निर्माण झालेले आहेत. तर "आमचे बैठे खेळ", "आमच्या गावातील पाण्याचे दुर्भिक्ष्य" इत्यादी लेखांची निर्मिती कोटिरुप विनोदाच्या सहाय्याने रंजन करण्याच्या प्रेरणेतून झालेली दिसते. सांस्कृतिक क्षेत्रातील अनिष्टांचा उपहास त्यांच्या "वर्तमानपत्रकर्ता", "साहित्य संमेलनाची पूर्वतयारी", "चोरांचे संमेलन" इत्यादी लेखांत आढळतो. त्यांच्या मुळाशीही रंजनाची प्रेरणा असली तरी त्यामध्ये वरच्या दर्जाचा कल्पनाविलास दिसतो. त्यांच्या सौंदर्यदृष्टीचा चोखंदळपणा व परिश्रमपूर्वकता दिसते. या गुणवैशिष्टयांमुळे त्यांचा हा कोटिरुप विनोद विमुक्ततेचा प्रत्यय देणारा आहे.

कोल्हटकरांनी मराठीतील "विनोद" या शब्दाला अधिक व्यापक अर्थ दिला. म्हणूनच "मराठी विनोदाचे जनक" असा त्यांचा यथार्थ गौरव केला जातो.

## चिं.वि. जोशी :

चिं.वि. जोशी यांनी कोल्हटकरांच्या लेखनांपासून स्फूर्ती घेतली. स्वत:च्या वेगळेपणाचा ठसा विनोदी वाङ्‌मय क्षेत्रात उमटविला. जीवनाचे वास्तव त्यच चिं.वि. जोशींनी विनोदात्म स्वरुपात मांडले.

"चिमणरावाचे च-हाट" या पुस्तकाला जोशींनी दिलेले "शेकडा शंभरातील एका माणसाचे आत्मचरित्र" हे पर्यायी नांव अत्यंत समर्पक आहे. चिमणरावांच्या आत्मनिवेदनपर स्फुट कथांतून महाराष्ट्रातील पांढरपेशा मध्यमवर्गीयांचे प्रदीर्घ कालखंडातील जीवनाचे अनेक अंगांनी चित्र रेखाटले. विसाव्या शतकाच्या प्रारंभीपासूनच्या तीन पिढयांचे जीवन यथातथ्य, अर्थपूर्ण आणि विनोदात्म स्वरुपात त्यांनी दाखविले. स्फुट विनोदी गोष्टीत अवतरणारी भीमाआजी खानावळवाली आपली जीवनकथा "चार दिवस सुनेचे" या कथेत सांगते. या कथेतून टिळककालीन पिढीतील कौटुंबिक जीवन राजकीय, सामाजिक ताणांसह प्रकट होते. पुढच्या पिढीतील चिमणरावांचे जीवन त्यांचे कुटुंबीय, गुडयाभाऊसारखे नातलग, गुलाब दिघे, प्रो. हवालदार यांच्यासारखे स्नेही यांसह आविष्कृत होते. चिमणरावांच्यानंतर दुस-या महायुध्दाचा काळ आणि त्यानंतरची मोठी झालेली मोरू-मैनाची पिढीही चिं.वि.नी रंगविली आहे.

चिं.वि. जोशींनी अर्धशतकाच्या कालावधीतील महाराष्ट्राचे कौटुंबिक सामाजिक, सांस्कृतिक जीवन त्यामधील बदलासह अर्थपूर्णरीतीने विनोदाच्या शैलीत अभिव्यक्त केले आहे.

## आचार्य प्र.के. अत्रे :

मराठीतील आघाडीच्या विनोदकारामध्ये आचार्य प्र.के. अत्रे यांचे स्थान महत्वाचे आहे. त्यांनी "ब्रॅण्डीची बाटली", "जांबुवंत दंतमंजन" इत्यादीसारख्या थोडक्याच विनोदी कथा लिहून आपल्या विनोदाचा प्रभाव दाखविला. अत्रे

यांच्या कथांतील विनोद हा बहुतांश स्वभावनिष्ठ आहे. त्यांच्या विडंबन-गीतातील बोचकपणा विनोदी कथांतही प्रकट झाला आहे. त्यांच्या कथांतील विनोदी पात्रे भाबडेपणामुळे काही वेळा वैगुण्याबद्दल सहानुभूती निर्माण करतात. अत्रे यांनी विनोद महाराष्ट्रातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविला, हे त्यांचे महत्वाचे कर्तृत्व आहे.

## दत्तू बांदेकर :

दत्तू बांदेकर यांच्या विनोदी लेखनांत बुध्दीची तल्लखता, कल्पनेची तरलता दिसून येते. त्यांचे बहुतेक लिखाण प्रासंगिक आहे. तत्कालीन राजकारण, समाज परिस्थिती यांचे प्रतिबिंब त्यांच्या विनोदी कथेत आढळते.

## ना.धों. ताम्हणकर :

ना.धों ताम्हणकरांच्या विनोदी लेखातील "दाजी" हा स्वभावनिष्ठ विनोदाचा उत्तम नमुना आहे. समाजातील रूढी, ढोंग नाहिसे करण्यासाठी त्यांच्या "दाजी"चा अवतार झाला आहे. त्यांच्या विनोदी कथांची प्रकृती चिं.वि. जोशी यांच्या विनोदी कथांच्या प्रकृतीशी मिळतीजुळती आहे.

याच कालखंडात शामराव ओक, वि.मा.दी.पटवर्धन, य.गो. जोशी, वि.वि. बोकील, डॉ. वर्टी यांनीही थोड्याफार प्रमाणात विनोदी कथालेखन केले.

## ग्रामीण मराठी विनोदी कथा :

ग्रामीण विनोदी कथा ही मराठी नवकथेच्या जन्माबरोबरच म्हणजे १९४५ च्या आसपास उदयास आली. गाडगीळ-गोखले-भावे यांनी युध्दानंतरच्या समाजजीवनाच्या नाविण्यपूर्ण अनुभूती नवकथेच्या रूपातून प्रकट केल्या. त्याचवेळी व्यंकटेश माडगूळकरांनी "माणदेशी माणसं" चित्रित करण्याचा प्रयत्न केला.

व्यंकटेश माडगूळकर :

व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या कथेतून माणदेशातील दु:खी, दरिद्री माणसांची व्यक्तिचित्रे रंगविली. त्यांच्या काही कथांमध्ये सौम्य विनोदाचा स्पर्श झालेला आढळतो. त्यांच्या कथांतील विनोद हा सौम्य पण नर्मविनोद आहे. माडगूळकरांच्या "माझा बाप" (माणदेशी माणसं), "शाळा तपासणी" (जांभळाचे दिवस), "मारुतराया", "आजीने पाहिलेला चोर" (व्यंकटेश माडगूळकराची कथा), "जुपी" (उंबरठा), "पाव्हणा" (वाटा), "बारीचे पोर" (वाळूचा किल्ला) या कथांमधून शुध्द अन् सौम्य विनोदी अनुभूतीचा कलात्मक आविष्कार झालेला आहे. त्यांच्या कथेला वास्तवतेचे भक्कम अधिष्ठान लाभलेले आहे. माणदेशातील माणूस, त्याच्याभोवती उत्पन्न झालेली परिस्थिती आणि त्यातून जन्मास येणारा मिस्कील विनोद यांचाच निखळ आविष्कार माडगूळकर आपल्या कथातून साधतात.

एक स्वतंत्र विनोदी लेखक म्हणून ग्रामीण विनोदी कथालेखकात त्यांचा तसा समावेश होत नसला तरी, "ग्रामीण विनोदी कथे"चा जन्म त्यांच्याच "माणदेशी माणसां"तून झालेला आहे, हे मान्य करावे लागेल.

शंकर पाटील :

वेगळ्या दमाचा व वेगळ्या ताकदचा ग्रामीण कथाकार मराठी ग्रामीण साहित्यात शंकर पाटलांच्या रुपाने उदयास आला. त्यांना इतर ग्रामीण कथा लेखकापेक्षा लघुकथेच्या घाटाची जाणीव अधिक आहे. त्यांच्यात एक प्रयोगशीलता आहे. त्यानी काही अत्यंत लक्षणीय अशा विनोदी कथा लिहिल्या. त्यापैकी "नाटक", "धिंड", ""नेमानेमी", "हिशोब", "मिटिंग" यासारख्या अत्यंत विनोदी आणि प्रथम दर्जाच्या कथा त्यांच्या विनोदी प्रतिभेची साक्ष देतात. त्यांच्या विनोदी

कथेतून येणारा विनोद उपरा, बाहेरचा नाही तर त्या जीवनाशी निगडित असा आहे. त्यांची निवेदनशैली सामर्थ्यवान असून भाषा रसरशीत आहे. त्यांच्या विनोदी कथांनी तर रसिकांच्या मनात आपले असे एक स्वतंत्र स्थान प्रस्थापित केले आहे. तथापि पाटलांची कथा ही ग्रामीण पातळीवरील करुण -गंभीर-नाटयात अधिक जीव ओततांना दिसते. "वळीव", "खइडा", "भार", "सारवण", "वेणा", "भुजंग", "भेटीगाठी" इत्यादी अनेक करुण-गंभीर कथांतून ग्रामीण माणसांच्या जीवाचा आकांत ऐकणारे शंकर पाटील आपल्या प्रतिभेचे खरेखुरे रूप प्रकट करताना दिसतात. त्यांच्या हास्यकथेतील निवेदनशैली कौशल्यपूर्ण असून छोटया छोटया वाक्यांच्या वेधक संवादशैलीतून व्यक्त झालेली त्यांची कथा एक देखणे रूप धारण करते.

द.मा. मिरासदार :

द.मा. मिरासदारांनी शुध्द ग्रामीण विनोदी कथा लिहिल्या आहेत. ग्रामीण जीवनात अदृश्यपणे वावरणाऱ्या विनोदाचा धागा मोठया कौशल्याने मिरासदारांनी रंगविला. पण त्यांचा विनोद बोचरा आणि गुदगुल्या करणारा आहे. अतिरंजितता, अवास्तवता, अतिशयोक्ती यांच्यावर त्यांचा विनोद आधारित आहे. मिरासदारांनी जीवनातील विसंगतीवर प्रामुख्याने बोट ठेवले. केवळ विनोदाच्या प्रेरणेने ग्रामीण कथा लिहिणारे मिरासदार हे एकमेव ग्रामीण कथाकार आहेत.

मिरासदारांच्या कथेबद्दल आनंद यादव यांनी म्हटले आहे;-"द. मा. मिरासदार यांनी ग्रामीण कथेला एक वेगळीच दिशा दाखवली. ही दिशा त्यांची कथा वाचताना तशी सोपी वाटते; पण ती दाखविणे आणि त्या मार्गाने पुढे जाणे हे तितकेच अवघड होते; हे आजच्या अनेक ग्रामीण कथालेखकांनी तथाकथित ग्रामीण विनोदी कथा लिहून न बोलता लेखी कबूल केले आहे. माडगूळकर-पाटील यांची यशस्वी ग्रामीण कथा प्रामुख्याने गंभीर

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

तिच्यात अधूनमधून मिस्कीलपणा येत होता, नाही असे नाही. पण शुद्ध ग्रामीण विनोदी कथा द.मा. मिरासदार यांनीच लिहिली." १५

मिरासदार यांच्यानंतर मराठी वाङ्मयातील कथेच्या क्षेत्रात अनेक नवनवीन विनोदी लेखक पुढे येत आहेत. अनेक कल्पना नवीन संदर्भाने नटवून वाचकांपुढे सादर करीत आहेत. मराठी विनोद आता स्थितीशीलतेकडून गतिशीलतेकडे, स्थूलाकडून सूक्ष्माकडे वाटचाल करीत आहे. अनेक हौशी लेखक या क्षेत्रात उतरत आहेत. त्यापैकी वसंत सबनीस बाळ सामंत, वसंत गांगल, सुभाष भेंडे, राजाराम हुमणे, राजा राजवाडे, रा.कृ. जोशी, वसंत इनामदार इत्यादी विनोदी लेखकांचा उल्लेख करता येईल. काही लेखिकाही थोड्याफार प्रमाणात ब-यापैकी विनोदी लेखन करताना दिसू लागल्या आहेत. एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणा-या लेखकांना अनेक क्षेत्रातील नवनविन वैज्ञानिक शोधामुळे विनोदाला ताजे घटक मिळण्याची फार मोठी शक्यता निर्माण झाली आहे.

सारांश :

"विनोद" या शब्दाचा अर्थ थट्टा, गंमत असा आहे. अनेक तत्वज्ञानी, विचारवंतानी "विनोदा"ची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या व्याख्यामधून विनोदाच्या एखाद-दुस-या वैशिष्टयाचा निर्देश आढळतो. या व्याख्या व्याप्ती वा अतिव्याप्तीच्या दोषांनी युक्त आहेत. त्यामुळे विनोदाची सर्वमान्य व्याख्या अद्याप व्हावयाची आहे. तथापि "जीवनातील विसंगतीचे सहृदयतेने केलेले चिंतन आणि त्याचा कलात्मक आविष्कार म्हणजे "विनोद" ही विनोदाची व्याख्या स्वीकारार्ह वाटते.

विनोदाचा सुक्ष्मपणे विचार करुन अभ्यासकांनी विनोदाचे अनेक प्रकार नोंदविलेले आहेत. या वर्गीकरणात स्वभावनिष्ठ, प्रसंगनिष्ठ आणि शब्दनिष्ठ हे विनोदाचे महत्त्वाचे प्रकार आहेत. मानवी स्वभावविशेषातून

SAHR. ... LIBRARY
SHIVAJI ... KOLHAPUR
KOLHAPUR

स्वभावनिष्ठ विनोद घडतो तर विपरीतपणा किंवा संकट यावर प्रसंगनिष्ठ विनोद आधारलेला असतो. अतिशयोक्ती हा शब्दनिष्ठ विनोदाचा आधार आहे.

मराठी वाङ्मयातील विनोदाचा विचार करता प्राचीन मराठी वाङ्मयात विनोदाचा वापर क्वचितच दिसतो. अव्वल इंग्रजी कालखंडात विनोदी साहित्याची निर्मिती होऊ लागली. मराठी वाङ्मयात विनोदी लेखनाची परंपरा कोल्हटकरांपासून सुरु झाली आणि आज अनेक साहित्यिकांनी विनोदाचा विविधांगी आविष्कार करुन मराठी साहित्यात विनोदाला स्वतंत्र स्थान व प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. त्यात चिं.वि. जोशी, प्र.के. अत्रे पु.ल. देशपांडे, शामराव ओक, दत्तू बांदेकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, वसंत सबनीस, सुभाष भेण्डे, बाळ गाडगीळ इ. लेखकांचे श्रेय अधिक आहे. आज मराठी विनोदी साहित्याला विविधांगी धुमारे फुटत आहेत. मराठी विनोदी साहित्य समृध्द आणि संपन्न होत आहे.

ग्रामीण मराठी कथा विनोदाच्या अंगाने लिहिण्याचा पायंडा व्यंकटेश माडगूळकरांनी पाडला. आणि शंकर पाटील, द.मा. मिरासदार यांनी त्यात लक्षणीय भर घालून तिला "मराठी विनोदी कथा" अशी स्वतंत्र संज्ञा प्राप्त करुन दिली.

प्रस्तुत प्रकरणामध्ये विनोदाचे स्वरुप आणि प्रकार पाहिले. मराठी साहित्यातील विनोदाचा धावता आढावा घेताना मिरासदारपूर्व मराठी विनोदी कथावाङ्मयाचे विहंगमावलोकन केले. पुढील दुसऱ्या प्रकरणामध्ये आपण मिरासदार यांच्या "माझ्या बापाची पेंड" व "गप्पागोष्टी" या कथासंग्रहातील कथांचे आशय व विनोदाचे स्वरुप पाहणार आहोत.

......

## प्रकरण पहिले

## संदर्भ ग्रंथ


१) कुलकर्णी कृ.पा. - व्युत्पत्ति कोश,
पुणे, १९६४.

२) वाटवे के.ना. - रसविमर्श, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
द्वितीयावृत्ती, १९६१, पृ.३२७ वरून उद्धृत.

३) कुलकर्णी उ.दा. - मराठी विनोद,
श्रीविद्या प्रकाशन, पुणे,
प्रथमावृत्ती, १९९०, पृ.४ वरून उद्धृत.

४) संपा. भागवत व इतर - साहित्य: अध्यापन आणि प्रकार,
मौज प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८७
पृ. ३३४ वरून उद्धृत.

५) उपरोक्त ४ - पृ. ३३४ वरून उद्धृत

६) जोशी वा.म. - विचारसौंदर्य,
व्हीनस प्रकाशन, पुणे,
तिसरी आवृत्ती, १९५९, पृ.५८

७) संपा. पवार गो.मा.- मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप
हातकणंगलेकर म.द. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,
प्रथमावृत्ती, १९८६, पृ.२२६.

८) देशपांडे मा.का. - साहित्यसाधना,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,
प्रथमावृत्ती, १९६१, पृ. ४२७.

९) डॉ. मालशे स.गं. - आवड-निवड,
सुपर्ण प्रकाशन, पुणे,
द्वितीयावृत्ती, १९७७, पृ. ११.

१०) भट गो.के. - "खाडिलकरांचा विनोद"
महाराष्ट्र साहित्य परिषद, प्रकाशन, पुणे,
१९७४, पृ. ३६-३७.

११) केळकर न.चिं. - हास्यविनोद मीमांसा,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,
द्वितीयावृत्ती, १९५८, पृ. ११८.

१२) गाडगीळ गंगाधर - साहित्याचे मानदंड,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,
प्रथमावृत्ती १९६२, पृ. ११८.

१३) अत्रे प्र.के. - विनोद-गाथा,
परचुरे प्रकाशन-मन्दिर, मुंबई,
तिसरी आवृत्ती, १९८६, पृ. ३.

१४) उपरोक्त [६] - पृ. ४२.

१५) डॉ. यादव आनंद - ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,
द्वितीयावृत्ती, १९८४, पृ. २०.

KOLHAPUR